# पाणीपट्टी दरवाढीचा ठराव शासनाकडे

## पाणीपुरवठा योजनेचा खर्च आणि उत्पन्न यामध्ये मोठी तफावत

गणेश पाटील

पालघर : वसई-विरार महापालिकेच्या पाणीपट्टी दरवाढीवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये संघर्ष पेटला आहे. भाजपने वाढीव पाणीपट्टी रद्द करण्याच्या मागणीसाठी महासभेत सभात्याग करण्याबरोबरच दुसऱ्या महासभेपूर्वी महापालिका मुख्यालयासमोर निदर्शनेही केली. एकीकडे पाणीपुरवठा योजना चालविताना दरवर्षी सुमारे १०० ते १२१ कोटी रुपयांची महसुली तूट सहन करावी लागत असल्याने प्रशासन आर्थिक अडचणीत आहे, तर दुसरीकडे वाढीव पाणीपट्टीला भाजपचा तीव्र विरोध आहे. त्यातच पाणीपट्टी वाढीचा ठरावच शासनाकडून विखंडित करण्यात यावा, अशी महापौरांनी घेतलेली भूमिका यामुळे या संपूर्ण प्रकरणाचा निर्णय आता शासनाच्या पातळीवर होणार आहे. मात्र, वाद केवळ पाणीपट्टी दरवाढीपुरता मर्यादित राहिलेला नाही. याच आर्थिक वर्षापासून मल प्रवाह सुविधा कर आणि पाणीपुरवठा लाभकरही आकारण्यात आले असून भाजपने या दोन्ही करांनाही विरोध केला आहे. त्यामुळे नागरिकांवरील वाढत्या कराचा बोजा हा मुद्दा राजकीयदृष्ट्या अधिक तापण्याची शक्यता आहे.

ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगरपरिषद आणि महानगरपालिकांच्या पाणीपुरवठा योजना 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर चालविण्याचे शासनाचे धोरण आहे. मात्र वसई-विरार महापालिकेच्या पाणीपुरवठा योजनेचा खर्च आणि पाणीपट्टीतून मिळणारे उत्पन्न यामध्ये मोठी तफावत आहे. महापालिकेच्या माहितीनुसार, पाणीपुरवठा योजना चालविण्यासह एमएमआरडीएला पाणी देयकापोटी करावा लागणारा खर्च पाहता वर्षाला सुमारे १८० ते १९० कोटी रुपये खर्च होतो. त्या तुलनेत पाणीपट्टीच्या माध्यमातून केवळ ६० ते ६५ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळते. त्यामुळे वर्षाला सुमारे १०० ते १२१ कोटी रुपयांची महसुली तूट निर्माण होते. ही तूट इतर करांच्या उत्पन्नातून भरून काढावी लागत असल्याने महापालिकेच्या आर्थिक नियोजनावर त्याचा परिणाम होत आहे. वसई-विरार महापालिका २००९ मध्ये अस्तित्वात आल्यानंतर पाणीपट्टीमध्ये कधीही वाढ झालेली नाही. महापालिकेने उत्पन्नाचे स्रोत वाढविण्यासाठी पुरेसे प्रयत्न केले नसल्याची नोंद महालेखाकारांच्या निरीक्षणांतही झाल्याचे सांगण्यात येते.

दरम्यान,प्रशासनाच्या मते, वसई-विरार महापालिकेने मलप्रवाह सुविधा कर आणि पाणीपुरवठा लाभकर लागू करण्याचा निर्णय इतर काही महानगरपालिकांच्या तुलनेत उशिरा घेतला आहे. इतर महानगरपालिकांमध्ये यापूर्वीच अशा स्वरूपाचे कर लागू करण्यात आले असून, महापालिकेच्या सेवा आणि पायाभूत सुविधांवरील वाढता खर्च पाहता हे कर लागू करणे आवश्यक असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. याच पार्श्वभूमीवर पाणीपट्टी दरवाढीसोबतच या दोन्ही करांची आकारणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र पाणीपट्टी प्रमाणेच मलप्रवाह सुविधा कर आणि पाणीपुरवठा लाभकरालाही भाजपचा विरोध असल्याने महापालिकेच्या उत्पन्नवाढीच्या प्रयत्नांना राजकीय विरोधाची किनार मिळाली आहे.

### दरवाढीचा प्रस्ताव आणि राजकीय विरोध

■ वसई-विरार महापालिका अस्तित्वात आल्यानंतर पाणीपट्टीत मोठी वाढ झालेली नव्हती. आता २०२६-२७ पासून पाणीपट्टीत सुधारणा करण्यासोबतच मलप्रवाह सुविधा कर आणि पाणीपुरवठा लाभकरही लागू करण्यात आले आहेत. या तिन्ही आकारणीला भाजपचा विरोध आहे.

■ भाजपचा मुख्य आक्षेप नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा न होण्याबाबत आहे. 'आधी नियमित पाणी, मग वाढीव कर' अशी भूमिका विरोधी पक्षनेते मनोज पाटील, गटनेते अशोक शेळके आणि जिल्हाध्यक्ष प्रज्ञा पाटील यांनी घेतली आहे. सेवा-सुविधांचा दर्जा सुधारल्याशिवाय नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक भार टाकू नये, अशी त्यांची मागणी आहे.

■ दुसरीकडे, वाढता खर्च आणि मोठी महसुली तूट पाहता उत्पन्नाचे स्रोत वाढविणे आवश्यक असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. महापौरांनीही शासनाकडून विशेष आर्थिक सहाय्य, पाण्याच्या दरात कपात आणि वीज देयकांवरील करांचा भार कमी करण्याची मागणी केली आहे.

■ त्यामुळे नागरिकांवरील आर्थिक भार आणि महापालिकेची आर्थिक शाश्वतता यामध्ये समतोल साधण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. भाजपचा विरोध, प्रशासनाची आर्थिक कोंडी आणि महापौरांची शासनाकडे धाव-या तिहेरी पेचातून पाणीपट्टीचा मार्ग आता शासनच ठरवणार आहे.

# दापचरीच्या जमिनीवर विकासाचा बुलडोझर नको

◆ डहाणू (प्रतिनिधी) :

## जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रकल्पग्रस्तांचे निवेदन | कृषी बाजार, एमआयडीसी प्रस्तावाला विरोध

दापचरी दूध प्रकल्पासाठी दशकांपूर्वी संपादित करण्यात आलेल्या जमिनीवर आंतरराष्ट्रीय कृषी बाजार आणि एमआयडीसीसारखे नवे विकास प्रकल्प प्रस्तावित असताना, 'विकासाला विरोध नाही; मात्र आदिवासींची जमीन, घरे आणि उपजीविका हिरावून घेऊन विकास नको,' अशी ठाम भूमिका दापचरी प्रकल्पग्रस्तांनी घेतली आहे. पुनर्वसन, गावठाण आणि जमिनीवरील हक्कांचे प्रश्न निकाली काढल्याशिवाय नव्या प्रकल्पांसाठी कोणतीही बेदखलीची कारवाई करू नये, अशी मागणी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

यासंदर्भात ३ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. दापचरी दूध प्रकल्पासाठी १९७०च्या दशकात परिसरातील विविध गावांमधील मोठ्या प्रमाणावर जमीन संपादित करण्यात आली. मात्र, अनेक कुटुंबांच्या पुनर्वसनासह जमीन, घर आणि उपजीविकेचे प्रश्न अद्याप कायम असल्याचा दावा प्रकल्पग्रस्तांनी केला आहे.

वर्षानुवर्षे याच जमिनीवर शेती करून उदरनिर्वाह करणाऱ्या कुटुंबांसाठी जमीन ही केवळ मालमत्ता नसून रोजगार आणि अन्नसुरक्षेचा आधार आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय कृषी बाजार किंवा एमआयडीसीसारख्या प्रकल्पांमुळे स्थानिकांच्या जमिनी व उपजीविकेवर परिणाम होणार असल्यास त्याबाबत स्पष्ट धोरण जाहीर करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

### न्यायालयीन निकालापर्यंत बेदखली नको

दापचरी प्रकल्पग्रस्तांच्या जमिनीवर शेती करणाऱ्या शेतकऱ्यांशी संबधित डब्ल्यूपी २५५९/२००० आणि डब्ल्यूपी ६९०४/२००९ या न्यायालयीन प्रकरणांचा संदर्भही निवेदनात देण्यात आला आहे. न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत आदिवासींच्या ताब्यातील व लागवडीखालील जमिनीवर कोणतीही बेदखलीची कारवाई करू नये, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच २५ मार्च २०२६च्या शासन निर्णयानुसार पात्र अतिक्रमित घरांचे नियमितीकरण करावे, पात्र कुटुंबांचे सर्वेक्षण करून यादी जाहीर करावी आणि हरकती-सुनावणीची संधी द्यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

**स्थानिकांना रोजगाराचे प्राधान्य :** नव्या विकास प्रकल्पात स्थानिक आदिवासींना रोजगार आणि आर्थिक संधीमध्ये प्राधान्य देण्याचे स्पष्ट धोरण जाहीर करावे, अशीही मागणी आहे. 'आधी प्रकल्पग्रस्तांचे हक्क, पुनर्वसन आणि उपजीविकेचे प्रश्न सोडवा; त्यानंतरच विकास आराखडा निश्चित करा,' अशी भूमिका निवेदनातून मांडण्यात आली आहे. त्यामुळे दापचरीतील जमीन, गावठाण, पुनर्वसन आणि अतिक्रमित घरांच्या नियमितीकरणाचा प्रश्न प्रशासन कसा सोडवते, याकडे आता परिसराचे लक्ष लागले आहे.

# शिक्षकांनी संस्कार, मूल्ये रुजवावीत : खा. डॉ. हेमंत सवरा

सफाळे (प्रतिनिधी) : विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासक्रमाचे शिक्षण न देता त्यांच्यात संस्कार, सामाजिक जाणीव, मूल्ये आणि सकारात्मक विचार रुजविण्याचे काम शिक्षकांनी करावे. समाजाच्या जडणघडणीत शिक्षकांची भूमिका महत्त्वाची असून, त्यातूनच सक्षम आणि संवेदनशील समाजाची निर्मिती शक्य आहे, असे प्रतिपादन खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी केले. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिनाचे औचित्य साधून संघर्ष संस्था महाराष्ट्र यांच्या वतीने शिक्षकांचा सत्कार आणि उल्लेखनीय कार्य करणाऱ्या आदर्श शिक्षकांचा गौरव करण्यात आला.

समाजासाठी आयुष्यभर कार्य करणाऱ्या अंगणवाडी सेविका, सामाजिक संस्थांमध्ये काम करणाऱ्या महिला आणि स्वतःच्या संघटनांच्या माध्यमातून सामाजिक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. समाजसेवेसाठी केवळ शैक्षणिक पात्रतेपेक्षा प्रतिकूल परिस्थितीत केलेले कार्य आणि त्यातून मिळालेला अनुभव अधिक मोलाचा असतो, असे सवरा यांनी सांगितले. शिक्षक विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञान देण्याबरोबरच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण करतात. परंपरा, संस्कृती आणि सामाजिक मूल्ये पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यातही शिक्षकांची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी सिंधुताई आणि सुमनताई यांसह विविध क्षेत्रांतील महिलांच्या योगदानाचा गौरव करण्यात आला.

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

पाणी पुरवठा विभाग
निविदा सूचना

मुंब्रा प्रभाग क्र.३० मध्ये मुख्य रस्ता ते एम.एस. कॉलेज पर्यंत २ इंची जलवाहिनी टाकणे व इतर कामे करणे या कामी ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहे. ज्या कंत्राटदाराविरुध्द शासकीय / निमशासकीय / सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्त भंगाचे कार्यवाहीच्या अनुषंगाने नोंदनी पत्र रद्द करण्याची कार्यवाही केली / सुरु आहे. अशा कंत्राटदाराना निविदा प्रक्रीयेत भाग घेता येणार नाही. निविदा सुचना व निविदा प्रपत्रे ठाणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळ https:://mahatenders.gov.in या संकेतस्थळ वर दि. ०७/०९/२०२६ रोजी दुपारी १६.०० पासून दि. १५/०९/२०२६ रोजी १६.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहे. दि.१५/०९/२०२६ रोजी पर्यंत सांय. १६.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. सदर निविदा दि.१५/०९/२०२६ रोजी सांय. १७.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/पा.पु-मुं. प्र.स/४७३/२०२६-२७ सही/-
दि:०४.०९.२०२६ कार्यकारी अभियंता
Pls visit our oficial web-site ठाणे महानगरपालिका, ठाणे
www.thanecity.gov.in

**अनधिकृत बांधकामाला आळा घाला..**
**अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !**

# जखमी गोविंदांच्या उपचारावरून रुग्णालयात गोंधळ

## शिवसेना पदाधिकाऱ्यांसह १७ जणांविरुद्ध तक्रार

◆ पालघर (प्रतिनिधी) :

जखमी गोविंदांच्या उपचाराच्या शुल्कावरून पालघर शहरातील रिलीफ हॉस्पिटलमध्ये गोंधळ घातल्याचा प्रकार समोर आला आहे. शिवसेना पदाधिकाऱ्यांनी डॉक्टरांकडे जाब विचारत रुग्णालय फोडण्याची धमकी दिली आणि एका कर्मचाऱ्याला मारहाण केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख कुंदन संखे, शहरप्रमुख राहुल घरत, आमदार राजेंद्र गावित यांचे पुत्र रोहित गावित यांच्यासह १७ जणांविरुद्ध पालघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

पालघर शहराच्या बाह्यवळण रस्त्यालगत कुंदन संखे यांच्या कार्यालयाच्या आवारात शनिवारी दहीहंडी उत्सव झाला. दहीहंडी फोडताना जखमी झालेल्या गोविंदांना रिलीफ हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. मध्यरात्रीपर्यंत सात जखमींवर उपचार सुरू होते. काहींचे सीटी स्कॅन, तर काहींचे एक्स-रे करण्यात आले होते. डोके व मणक्याला दुखापत झालेल्या रुग्णांना २४ तास निरीक्षणाखाली ठेवण्याचा सल्ला देण्यात आला होता.

> "किरकोळ जखमी गोविंदांना वेळेवर डिस्चार्ज मिळत नसल्याने चौकशीसाठी रुग्णालयात गेलो होतो. एका जखमीच्या डिस्चार्जसाठी १० हजार रुपयेही भरले होते. अन्य पथकांकडून तक्रारी आल्याने चौकशी केली असता किरकोळ वाद झाला." - कुंदन संखे, जिल्हाप्रमुख, शिवसेना, पालघर

### १९ हजार ८६६ रुपयांच्या बिलावरून वाद

तपासण्या व उपचाराचे एकूण १९ हजार ८६६ रुपयांचे बिल झाले होते. यातील १० हजार रुपये आयोजकांकडून जमा करण्यात आल्याची माहिती रुग्णालयाने दिली. दरम्यान, कुंदन संखे, राहुल घरत आणि अन्य शिवसैनिक रुग्णालयात दाखल झाले. जखमींचे सीटी स्कॅन का करण्यात आले, अशी विचारणा त्यांनी डॉक्टरांकडे केली. डोक्याला दुखापत झाल्याने सीटी स्कॅन आवश्यक असल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केले. यानंतर वाद वाढला. डॉक्टरांशी अर्वाच्च भाषेत बोलत रुग्णालय फोडण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. राहुल घरत यांनी एका कर्मचाऱ्याला मारहाण केल्याचाही आरोप करण्यात आला असून, हा प्रकार सीसीटीव्हीत कैद झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. तसेच अतिदक्षता विभागातील रुग्णांना रुग्णालयातून सोडण्यास भाग पाडल्याचा आरोपही प्रशासनाने केला आहे. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता (BNS) मधील कलम ११५(२), ३५१(२), ३५२, ३२९(४), १८९(१), १८९(२), १९० तसेच महाराष्ट्र वैद्यकीय सेवा-व्यक्ती आणि संस्था अधिनियम, २०१० मधील कलम ३ व ४ अंतर्गत कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

# दहीहंडी उत्सवात १६ गोविंदा जखमी

### १५ जणांना किरकोळ दुखापत; १३ वर्षीय गोविंदावर उपचार सुरू

विरार (प्रतिनिधी) : वसई-विरार आणि नालासोपारा परिसरात शनिवारी दहीहंडी उत्सव उत्साहात पार पडला. मानवी मनोरे रचताना पडल्याने १६ गोविंदा जखमी झाले. यापैकी १५ जणांना किरकोळ दुखापत झाल्याने उपचारानंतर घरी सोडण्यात आले.

तर १३ वर्षीय अनुज रजाक याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्याच्यावर सर डी. एम. पेटीट रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्याची प्रकृती स्थिर असल्याची माहिती महापालिकेच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. भक्ती चौधरी यांनी दिली.

महापालिकेच्या माहितीनुसार, यंदा परिसरात खासगी व सार्वजनिक ठिकाणी मिळून ८२५ दहीहंडी उत्सवांचे आयोजन करण्यात आले होते. ११८ गोविंदा पथकांमधील सुमारे आठ हजार गोविंदांनी महापालिकेकडे नोंदणी केली होती. जखमी गोविंदांवर चंदनसार रुग्णालयात सात, तुळींजमध्ये चार, सोपारा रुग्णालयात दोन आणि सर डी. एम. पेटीट रुग्णालयात तीन जणांवर उपचार करण्यात आले.

मोठ्या संख्येने गोविंदा सहभागी होऊनही गंभीर घटना टळल्या. मात्र, १३ वर्षीय गोविंदाच्या दुखापतीमुळे दहीहंडी उत्सवातील सुरक्षाव्यवस्थेबाबत अधिक गांभीर्याने उपाययोजना करण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

# इमारतीच्या पाचव्या मजल्यावरून पडून मजुराचा मृत्यू

◆ प्रतिनिधी (वसई ) :

विरार पश्चिमेतील बोळींज परिसरात शनिवारी सकाळी इमारतीच्या पाचव्या मजल्यावरून पडून २६ वर्षीय मजुराचा मृत्यू झाला. रमजान रियाजुल शेख असे मृत मजुराचे नाव आहे.

वसई-विरार शहरात विविध भागांत मोठ्या गृहनिर्माण प्रकल्पांचे काम वेगाने सुरू असताना बांधकाम मजुरांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. सुरक्षा उपाययोजनांचा अभाव आणि नियमांकडे होणारे दुर्लक्ष यामुळे मजुरांच्या जीविताला धोका निर्माण झाला असून, महिनाभरात उंचावरून पडून मजुरांच्या मृत्यूची ही चौथी घटना आहे..बांधकामाच्या ठिकाणी काम करणाऱ्या मजुरांना हेल्मेट, सेफ्टी बेल्ट, सुरक्षा जाळी यांसह आवश्यक सुरक्षा साधने उपलब्ध करून देणे अपेक्षित असते. मात्र, अनेक ठिकाणी या सुरक्षा उपायांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला जात आहे. वसई-विरार शहरात टोलेजंग इमारतींचे बांधकाम मोठ्या प्रमाणावर सुरू असताना मजुरांच्या सुरक्षेची जबाबदारी कोणाची, असा प्रश्न या सलग दुर्घटनांमुळे उपस्थित झाला आहे.

# डहाणूच्या राजकारणाला धक्का!

## शिवसेना शिंदे गटाचे विपुल पटेल यांचा राजीनामा

◆ डहाणू (प्रतिनिधी) :

शिवसेना शिंदे गटाचे धडाडीचे कार्यकर्ते तथा राई ग्रामपंचायतीचे उपसरपंच विपुल रमान पटेल यांनी गुरुवारी पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याने डहाणूच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या तोंडावर झालेल्या या राजीनाम्यामुळे स्थानिक राजकीय समीकरणांबाबत चर्चांना वेग आला आहे.

पटेल यांनी पक्षातील वरिष्ठ नेते आणि पदाधिकाऱ्यांकडे सोशल मीडियाच्या माध्यमातून राजीनामा पाठविल्याचे सांगण्यात येते. पक्ष सत्तेत असतानाही ग्रामपंचायतीसह गावातील विकासकामांसाठी अपेक्षित सहकार्य आणि निधी मिळत नसल्याची नाराजी त्यांनी यापूर्वी व्यक्त केली होती. तळागाळातील कार्यकर्त्यांच्या प्रश्नांकडे नेतृत्वाने गांभीर्याने पाहावे, अशी त्यांची भूमिका होती. दरम्यान, राजीनाम्यानंतर विविध राजकीय पक्षांकडून पटेल यांच्याशी संपर्क साधला जात असल्याची चर्चा आहे. मात्र, सध्या कोणत्याही पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतलेला नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

'सामाजिक कार्य करत आलो आहे आणि पुढेही सामाजिक कार्य करत राहणार,' अशी भूमिका त्यांनी घेतली आहे. त्यामुळे त्यांची पुढील राजकीय दिशा काय असेल, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

### ग्रामीण भागात प्रभाव

■ आक्रमक भूमिका, कार्यकर्त्यांशी सातत्यपूर्ण संपर्क आणि सामाजिक कामामुळे पटेल यांनी डहाणूच्या ग्रामीण राजकारणात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. त्यामुळे त्यांचा राजीनामा केवळ पक्षांतर्गत नाराजी म्हणून न पाहता आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाची राजकीय घडामोड मानली जात आहे.

■ विशेषतः डहाणू नगरपरिषदेच्या मागील नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाच्या यशामध्ये पटेल यांच्या संघटनात्मक कामाचा आणि जनसंपर्काचा महत्त्वाचा वाटा असल्याचा दावा त्यांच्या समर्थकांकडून केला जातो. त्यामुळे त्यांच्या पुढील निर्णयाकडे आता डहाणूच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### राजीनाम्यानंतर हालचाली

पटेल यांच्या राजीनाम्याची माहिती समोर आल्यानंतर स्थानिक पदाधिकारी, सरपंच, सहकारी आणि समर्थकांमध्ये चर्चांना सुरुवात झाली आहे. त्यांच्या राजीनाम्याचा आगामी निवडणुकांवर कितपत परिणाम होतो, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

**UJJIVAN**

# उज्जीवन स्मॉल फायनांस बँक

नोंदणीकृत कार्यालय: ग्रेप गार्डन, क्र. २७, ३ रा "ए" क्रॉस, १८ वा मेन, ६ वा ब्लॉक, कोरामंगलम बेंगळूरू – ५६००९५, कर्नाटक
क्षेत्रिय कार्यालय: ७ वा मजला, अलमोन्टे आयटी पार्क, सर्वे क्र. ८ खराडी-मुंढवा बायपास, गाव खराडी, पुणे ४११०१४.

## जाहीर लिलाव सूचना

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ८(६) आणि ९ सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, (सरफेसी कायदा) २००२ अंतर्गत विक्रीसाठी जाहीर सूचना**

**उज्जीवन स्मॉल फायनांस बँक लि.** चे अधिकृत अधिकारी म्हणून अधोस्वाक्षरीने, सरफेसी कायदा च्या कलम १३ (४) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषतः कर्जदारांना आणि सामान्य जनतेला सूचित करण्यात येते की बँकेच्या थकबाकीच्या वसुलीसाठी खाली नमूद केलेल्या खात्यातील तारण मालमत्तेचा सार्वजनिक लिलाव **"जसे आहे जेथे आहे" आणि "जसे आहे तसे आहे तत्वावर"** खाली नमूद दिनांकाला करण्यात येईल.

| अनु. क्र. | कर्ज खाते क्र./ शाखा | कर्जदार/ सह-कर्जदार/ हमीदार/ गहाणदारांचे नाव | १३ (२) सूचना दिनांक/ थकीत देणी (रु. मध्ये) अनुसार | ताब्याचा दिनांक | राखीव मूल्य आयएनआर मध्ये/ इठे आयएनआर मध्ये |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 4416210130000171/ 4416- कल्याण | १. श्री असगर नियामत अन्सारी, २. साना असगर नियामत अन्सारी. दोघांचा पत्ता: खोली क्र. ३०, सागर निवास चाळ, सोनाली नगर समोर, मुंब्रा, साउथ इंडियन बँक समोर, मुंब्रा, ठाणे, महाराष्ट्र ४००६१२. | 11.10.2021/ Rs.1792596.00 ३०.०९.२०२१ अनुसार | 29.04.2026 | Rs.1344000/- Rs.134400/- |
| | | **स्थावर मालमत्तेचे वर्णन :** ग्रामपंचायत आदिवली – ढोकाळीच्या हद्दीमधील गाव आदिवली – ढोकाळी, तालुका अंबरनाथ, जिल्हा ठाणे येथे वसलेल्या सर्वे क्र. ३३, हिस्सा क्र. १, सर्वे क्र. ३३, हिस्सा क्र. २, सर्वे क्र. ३२, हिस्सा क्र. ३ वर बांधण्यात आलेल्या "शिव शक्ती अपार्टमेंट" म्हणून ज्ञात असलेल्या इमारतीच्या सी विंग च्या १ ल्या मजल्यावरील ५६० चौ. फू. (बिल्ट अप क्षेत्रफळ) असलेल्या मालमत्तेचा धारण केलेला सदनिका क्र. १०३ चा सर्व खंड आणि भूखंड. | | | |
| 2 | 445621005000000 02 / 4456- भिवंडी | **१.अनुपकुमार फुलचंद केशरवाणी, २. राधा अनुपकुमार केशरवाणी.** दोघांचा पत्ता: सदनिका क्र. ०६, ३ रा मजला, बालाजी प्लाझा, भारत कॉलनी, कामतघर रोड, चंदनबाग, भिवंडी, ठाणे, महाराष्ट्र ४२१३०५. अनु. क्र. १ येथे देखील: न्यू संजय टाईल्स, घर क्र. १७०/२, केएपी, कमला हॉटेल, समोर आग्रा रोड, भिवंडी, ठाणे, महाराष्ट्र ४२१३०२ | 08.04.2025 / Rs. 21,43,061.88 ०४.०४.२०२५ अनुसार | 10.07.2025 | Rs.1260000/- Rs.126000/- |
| | | **स्थावर मालमत्तेचे वर्णन :** नोंदणीकरण जिल्हा ठाणे आणि उप जिल्हा भिवंडीमधील भिवंडी निझामपूर महानगरपालिका हद्दीमधील, गाव कामतघर, ता. भिवंडी, जिल्हा ठाणे येथे असलेल्या आणि वसलेल्या जमिनीचा धारण केलेला सर्वे क्र. ५, हिस्सा क्र. ७ (पैकी) वर बांधण्यात आलेल्या "बालाजी प्लाझा को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड" म्हणून ज्ञात सोसायटीमधील बालाजी प्लाझा" म्हणून ज्ञात आरसीसी इमारतीच्या ३ ऱ्या मजल्यावरील ५७० चौ. फू मोजमापाच्या मालमत्तेचा धारण केलेला सदनिका क्र. ८ सर्व खंड आणि भूखंड. **मालमत्तेच्या सीमा पुढील प्रमाणे:** पूर्वः अंतर्गत रोड, पश्चिमः इमारत, उत्तरः इमारत, दक्षिणः इमारत. **अनुपकुमार फुलचंद केशरवाणी आणि राधा अनुपकुमार केशरवाणी ह्यांच्या मालकीचे.** | | | |
| 3 | 4416210130000270/ 4416- कल्याण | **१) विनोद तर्केश्वरनाथ दुबे, २) पूजा विनोद दुबे,** दोघेही खोली क्रमांक २ जय गुरुदेव चाळ क्रमांक २ न्यू शिवाजी नगर कळवा ठाणे महाराष्ट्र-४००६०५ येथे राहतात. अनु. क्र. १ येथे देखील १) एकविरा शाळा चाळ क्र. ०६, आर.एन. ०७, आनंद नगर, कळवा पूर्व, ठाणे, महाराष्ट्र – ४००६०५. | 25.11.2022 / Rs. 10,57,667.11 १९.१०.२०२२ अनुसार | 26.09.2025 | Rs.756000/- Rs.75600/- |
| | | स्थावर मालमत्तेचे वर्णन: "नीळकंठ पॅराडाईज" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीत, तळमजल्यावर, ४६५ चौरस फूट क्षेत्रफळ (बांधकाम क्षेत्र - सामान्य क्षेत्रांसह), जे ४३.२१ चौरस मीटरच्या समतुल्य आहे, हे सर्व्हे क्रमांक ४८, हिस्सा क्रमांक ७, श्री मलंगगड रोड, कल्याण (पूर्व), गाव- पिसावली, तालुका- कल्याण, जिल्हा- ठाणे, ग्रामपंचायत- पिसावलीच्या हद्दीत बांधले आहे. **सीमा पुढील प्रमाणे:** पूर्व- कावेरी इमारत, पश्चिम- खुली जागा, दक्षिण- अंतर्गत रस्ता, उत्तर- खुली जागा. | | | |
| 4 | 4411210170000106/ 4411- कोपरखैराने | **१.गणेश सदाशिव सूर्यवंशी, २. सुषमा सूर्यवंशी** दोघांचा पत्ता: १ ला मजला, खोली क्र. ४, हिल व्यू पार्क, चिंचवली रोड, सरस्वती नगर, खोपोली रायगड, महाराष्ट्र ४१०२०३. अनु. क्र. १ येथे देखील: पंचायत समिती खालापूर, स्वामी विवेकानंद शाळे जवळ, मुंबई पुणे एक्सप्रेस वे, रायगड महाराष्ट्र ४१०५०२ | 09.01.2024/ Rs.1572364.86 ०८.०१.२०२४ अनुसार | 13.02.2026 | Rs.970000/- Rs.97000/- |
| | | **स्थावर मालमत्तेचे वर्णन :** सदनिका क्र. ३०८, ३ रा मजला, आर्या रेसिडन्सी म्हणून ज्ञात इमारत, ४२७ चौ. फू. चटई क्षेत्र, धारण केलेला घर क्र. २३६(३०८), गाव पाले बुद्रुक, ता. पनवेल जिल्हा रायगड | | | |
| 5 | 441121013000468 / 4411- कोपरखैराने | **१.सिद्धार्थ गौतम गवई, २. नेहा सिद्धार्थ गवई** दोघे येथे देखील: घर क्र. २५८ पंचशील नगर, सेक्टर १७, पनवेल रायगड, महाराष्ट्र ४१०२०६. अनु. क्र. १ येथे देखील: टिव्हीएस सप्लाय चेन सोल्युशन्स लि., बिल्डींग क्र. ए-१९, गाळा क्र. ए-१९-१२, १२, १४ हरिहर कॉम्प्लेक्स, माणकोली नाका, भिवंडी, ठाणे, महाराष्ट्र ४२१३०२. अनु. क्र. २ येथे देखील: शुभांगी एस. म्हात्रे, नील इम्प्रस सीएचएस सदनिका ३०१, सेक्टर १-५, सिडको ऑफिस जवळ, एचडीएफसी सर्कल, पनवेल, महाराष्ट्र ४१०२०६ | 29.05.2024 / Rs. 1027951.07 २८.०५.२०२४ अनुसार | 27.03.2026 | Rs.935000/- Rs.93500/- |
| | | **स्थावर मालमत्तेचे वर्णन:** गाव चिपले बोनशेत, तालुका पनवेल, जिल्हा रायगड, महाराष्ट्र येथे वसलेल्या साधारण पणे ४३५६ चौ. मी. क्षेत्रफळ आकाराच्या जमिनीचा धारण केलेला मिळकत क्र. ११२ डी वर बांधण्यात आलेल्या "सेव्हन सिटी" म्हणून ज्ञात इमारतीच्या विंग डी च्या तळ मजल्यावरील साधारण पणे २७१ चौ. फू. चटई क्षेत्रफळ असलेली सदनिका क्र. ००२ चा सर्व खंड आणि भूखंड. ज्याची मालकी सिद्धार्थ गौतम गवई ह्यांची आहे. | | | |

| | | |
|---|---|---|
| **मालमत्ता (मत्ता) च्या पाहणीचा दिनांक आणि वेळ** | :: | १०.०९.२०२६ आणि २४.०९.२०२६ रोजी स. ११ वा. ते सायं. ४ वा. दरम्यान |
| बोली आणि इरठेच्या सादरीकरणासाठी दिनांक | :: | २८.०९.२०२६ रोजी स. ११:०० वा. ते सायं. ५.०० वा. पर्यंत |
| लिलावाचा दिनांक आणि वेळ | :: | २९.०९.२०२६ रोजी दु. २:०० ते सायं. ५:०० वा. दरम्यान |

**इसारा रक्कम ठेव (इरठे) आयएनआर मध्ये ("उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि." च्या नावे डिमांड ड्राफ्टद्वारे भरावेत),**

**बोली सादर करण्याचे आणि लिलावाचे ठिकाण:**
उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि. नानक अपार्टमेंट हॉटेल झायका समोर, खडकपाडा सर्कल जवळ, कल्याण मुरबाड रोड, वायले नगर, कल्याण ४२१३०१.
**संपर्क तपशील: अमोल जोशी - ७९००१२७५५५ चंद्र मोहन चौधन : ८१०८८३८२८६).**

**अटी आणि शर्ती :** ई- लिलाव "जसे आहे जेथे आहे" आणि "जसे आहे तसे आहे तत्वावर" करण्यात येणार आहे.

१. प्राधिकृत अधिकारी यांच्या माहितीनुसार कोणत्याही मालमत्तेवर कोणत्याही स्वरूपाचा भार नाही. मात्र मालमत्तेचे हक्क, हक्क संबंध तसेच त्यावरील भार आदी यांची माहिती तसेच मालमत्तेच्या संदर्भातील दावे, हक्क देणी आदी यांची माहिती जाणून घेण्यासाठी इच्छुक खरेदीदार यांनी मालमत्तेच्या संदर्भात स्वतंत्र चौकशी बोली सादर करण्याच्या पूर्वी करावी. इ लिलावाची जाहिरात म्हणजे वचन किंवा बँकेचे प्रतिनिधित्व नाही आणि असणार नाही. मालमत्ता ही सध्याच्या आणि भविष्यातील भारांसह विक्री केली जात आहे जे बँकेला ज्ञात आहेत किंवा ज्ञात नाहीत. प्राधिकृत अधिकारी / संरक्षित धनको हे तृतीय पक्षकार यांचे हक्क, हक्क संबंध दावे अथवा देणी यांना जबाबदार असणार नाहीत.
२. बोली सादर करण्याच्या आधी मालमत्तेची चौकशी करणे आणि पाहणी करणे ही इच्छुक खरेदीदार यांची जबाबदारी आहे. लिलावासाठी ठेवण्यात आलेल्या मालमत्तांची पाहणी इच्छुक खरेदीदार यांना प्रत्येक मालमत्तेसमोर वरील प्रमाणे नमूद केलेल्या वेळेनुसार करता येईल.
३. इच्छुक खरेदीदार यांनी आपली बोली निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडे वरील प्रमाणे नमूद केलेल्या लिलावाच्या तारखेच्या आधी एक दिवस सादर करणे आवश्यक आहे.
४. ई लिलाव उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक मान्यताप्राप्त ई-लिलाव सेवा पुरवठादार **मे. सी 1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड** यांच्याद्वारे करण्यात येईल. संपर्क व्यक्तीः **प्रभाकरन एम - (मो क्र ७४१८२८१७०९).** इच्छुक बोलीदारांना सल्ला देण्यात येत आहे की त्यांनी **https://www.bankeauctions.com** किंवा **https://www.ujjivansfb.in/e-auctions** ला भेट देऊन मालमत्तेचा तपशील जाणून घ्यावा आणि बोली प्रक्रियेत सहभाग घेण्यासाठी आपली नावे नोंदविण्यासाठी **https://www.bankeauctions.com** ला भेट द्यावी आणि युजर आयडी आणि पासवर्ड प्राप्त करून घ्यावा. इच्छुक खरेदीदार यांना ई लिलावाच्या संदर्भात ऑनलाईन प्रशिक्षण सेवा पुरवठादार मेसर्स सी १ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, हेल्प लाईन क्रमांक ७२९११८८२४, २५, २६ इ मेल आयडी **support@bankeauctions.com, लिलाव पोर्टल https://www.bankeauctions.com येथे देण्यात येईल.**
५. मालमत्तेची विक्री सर्वाधिक बोली सादर करणाऱ्याला करण्यात येईल मात्र ते संरक्षित धनको म्हणजेच उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड यांच्या मान्यतेस अधीन असेल. मात्र निम्नस्वाक्षरीकार यांना आवश्यकता भासल्यास इंटर से बिडिंग प्रक्रिया घेण्याचा निर्णय घेण्याची मुभा आहे. बोली स्वीकारण्याचा तसेच कोणतेही कारण न देता कोणतीही बोली / निविदा नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार याना आहे.
६. यशस्वी बोलीदार यांचे ईएमडी विक्री किमतीचा भाग म्हणून राखून ठेवले जाईल आणि अयशस्वी बोलीदार यांचे ईएमडी परत देण्यात येईल. ईएमडी रकमेवर कोणत्याही स्वरूपाचे व्याज दिले जाणार नाही. यशस्वी बोलीदार यांना विक्री किमतीच्या २५ % रक्कम ईएमडी ॲडजेस्ट करून प्राधिकृत अधिकारी यांच्याकडून बोली स्वीकारली गेल्यानंतर २४ तासांत अदा करणे आवश्यक आहे. आणि विक्री किमतीच्या उर्वरित ७५% रक्कम विक्री निश्चित झाल्याच्या १५ दिवसात किंवा परस्पर सहमतीने ठरलेल्या दिवशी जो तीन महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही, त्या दिवशी प्राधिकृत अधिकारी यांनी मान्य केल्यानुसार अदा करणे आवश्यक आहे. यशस्वी बोलीदार यांनी वरील प्रमाणे नमूद केलेल्या अनुसार रक्कम अदा केली नाही या आधीच भरणा केलेली रक्कम जप्त होण्यास पात्र असेल आणि मालमत्ता पुन्हा इ लिलावाद्वारे विक्रीसाठी ठेवण्यात येईल आणि थकीत खरेदीदार यांचा मालमत्तेवर कोणताही अधिकार किंवा दावा करता येणार नाही.
७. सदर प्रसिद्धी सूचना अमलबजावणी होणाऱ्या मुद्द्यांना अनुसरून आहे.
८. बोलीदारांनी आपल्या हितासाठी शेवटच्या क्षणी बोली लावणे टाळावे कारण खंडित वीज / खंडित इंटरनेट आदींसाठी उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक किंवा सेवा पुरवठादार जबाबदार असणार नाहीत अशा घटना टाळण्यासाठी बोलीदारांना आवाहन करण्यात येते आहे की त्यांनी पॉवर सप्लाय बॅक अप आदींची सोय करून ठेवावी. ज्यायोगे त्यांना लिलाव प्रक्रियेत विना अडथळा सहभाग घेता येणे शक्य होईल.
ही सूचना वरील प्रमाणे नमूद केलेले कर्जदार / हमीदार / तारण दार यांना तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीच्या वेळापत्रकाची सूचना आहे.

ठिकाण: महाराष्ट्र, दिनांक : ०७.०९.२०२६ सही/- प्राधिकृत अधिकारी, उज्जीवन स्मॉल फायनांस बँक